सिटी न्यूज सुपरफास्ट

तलवार रास गरबा



# विष्णुपंत खेंडकर विद्यालयात सायबर सुरक्षेवर सेमिनार

प्रतिनिधी १९ ऑक्टोबर

**अकोला:** विष्णुपंत खेंडकर विद्यालय येथे सायबर गुन्हे जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सायबर क्राईम हे आंतरराष्ट्रीय समस्या झाली असून विद्यार्थ्यांनी त्याबाबत सावधगिरी बाळगावी. व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, फोन पे, गुगल पे इत्यादींचा वापर सध्या सर्वच क्षेत्रात होत आहे. लोन फ्रॉड, फेस फ्रॉड, वाईस फ्रॉड यापासून विद्यार्थ्यांनी सावध कसे राहावे हे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. ओ टी पी चा नेमका अर्थ काय आहे. अपुऱ्या किंवा चुकीच्या माहितीमुळे फसवणुक होऊ शकते. त्यातून गंभीर स्वरूपाचा गुन्हा अथवा नुकसान होऊ शकते. यासाठी



विद्यार्थ्यांनी इंटरनेट, मोबाईल वापरताना विशेष काळजी घ्यावी असे आवाहन याप्रसंगी करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील अभिषेक बाजड आणि निशांत आगरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रशिक्षण दिले. कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने व 'क्विकहिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ.जे. एम. साबू सर आणि उपक्रमाचे समन्वयक डॉ. एच.जे. खरात यांच्या मार्ग दर्शना खाली आयोजित करण्यात आली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री निलेश खेंडकर व प्राथमिक मुख्याध्यापक अल्केश खेंडकर यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.